**MHKO100006132013**

## <u>आदेश निशाणी क्र.७६</u>

(रामचंद्र वि. आनंद)

प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी सदरचा अर्ज "उलटतपास नाहीचा" आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादीतर्फे वादी यांचा उलट तपास नाही असा आदेश मे. कोर्टांनी दिनांक २४.०६.२०२५ रोजी पारीत झाला असून तो आदेश रद्द करून प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना उलट तपास घेण्यास परवानगी मिळावी. प्रतिवादी यांनी वादी यांचा उलटतपास घेण्यास जाणूनबुजून टाळाटाळ केलेली नाही. प्रतिवादी क्र. १ ते ३ अल्पशिक्षीत असून त्यांना कायदयाचे ज्ञान नाही. सदरहु कामातील पुर्वीचे वकील आजारी होते त्यामुळे त्यांच्याकडून कागद वेळेत उपलब्ध झाले नाहीत. प्रतिवादी यांना वादीचा उलटतपास घेण्यास परवानगी दिल्यास वादीचे काहीही नुकसान होणार नाही. याउलट तसे न झाल्यास प्रतिवादी यांचे कायदेशीर हक्कास बाधा पोहोचणार आहे. सबब प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्याविरूध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द होवून प्रतिवादी यांना उलटतपास घेण्यास परवानगी मिळावी.

३. वादी यांनी त्याच अर्जावर म्हणणे दाखल केले असून खर्च बसवून अर्ज मंजूर करावा असे कळविले आहे.

**४.** प्रतिवादी क्र. १ ते यांचा अर्ज व वादी यांनी त्याच अर्जावर दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

**५.** अभिलेखावरील सर्व कागदपत्राचे अवलोकन केले असता वादी यांनी सदरचा दावा हक्कज्ञापनासाठी, वाटपासाठी व कायम मनाई ताकीदीकरीता दाखल केला आहे. वादीतर्फे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दिनांक २१/११/२०१७ रोजी दाखल केले आहे. त्यानंतर दिनांक २४/०६/२०२३ रोजी प्रतिवादी यांचेविरूध्द "उलटतपास नाहीचा" आदेश पारीत झालेला आहे. त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना पुरावा करण्याची संधी देणे नैसर्गिक न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. प्रतिवादी यांच्या कथनावर अविश्वास ठेवण्यासारखी परिस्थिती अभिलेखावर आलेली नाही. सबब प्रतिवादी यांचे अर्जातील कथनांचा विचार करता त्यांचे विरूध्द झालेला "उलटतपास नाहीचा" आदेश रद्द करणे आवश्यक आहे व त्यांना वादी यांचा उलटतपास घेण्यास परवानगी देणे न्यायोचीत होणार आहे. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आ दे श**

**१)** अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२)** प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचेविरूध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करून त्यांना वादी यांचा उलटतपास घेण्यास परवानगी देण्यात येते.

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2025.07.16 13:34:38 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक १६/०७/२०२५

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज